PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Gulacha Ganpati
Year: 1953

Song: Shrihari Vidura Ghari Pahuna
Lyricist: Ga. Di. Madgulkar

सुवर्णद्वारावतचा राणा
श्रीहरी विदुरा घरी पाहुणा
श्रीहरी विदुरा घरी पाहुणा
विदुरा घरी पाहुणा

मिष्टान्ने कोठून
मिष्टान्ने कोठून
आणिला कणी कोंडा रांधून
आणिला कणी कोंडा रांधून
सांगे आवर्जुन
भाबडी विदुराची सुगरण
वाणी रूचकरपणा
श्रीहरी विदुरा घरी पाहुणा
श्रीहरी विदुरा घरी पाहुणा

कवळ मुखी नेतसे
कवळ मुखी नेतसे
मागूनी पुन्हा पुन्हा घेतसे
मागूनी पुन्हा पुन्हा घेतसे
तृप्त मनी होतसे
तृप्तीची ढेकर वर देतसे
विसरे जलपाना
श्रीहरी विदुरा घरी पाहुणा
श्रीहरी विदुरा घरी पाहुणा

प्रेमळपण आगळे
प्रेमळपण आगळे
चाटीतो उरली सुरली दळे
चाटीतो उरली सुरली दळे
योग्यांना ना मिळे
मूर्त ते परब्रह्म सावळे
मूर्त ते परब्रह्म सावळे
काय लाडकेपणा
श्रीहरी विदुरा घरी पाहुणा
श्रीहरी विदुरा घरी पाहुणा
सुवर्णद्वारावतचा राणा
श्रीहरी विदुरा घरी पाहुणा
पाहुणा विदुरा घरी पाहुणा
श्रीहरी विदुरा घरी पाहुणा

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*